म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. 1570

# अश्रुयज्ञ



REFBK-0008366
REFBK-0008366

डॉ. शं. जा. पुरवार

# अश्रु-यज्ञ

(क्लिष्ट नवकाव्याच्या युगांतील एक विचारप्रवर्तक, मौलिक,
व ओजस्वी काव्य.)

कवि डॉ. शं. जा. पुरवार, L. C. P. & S. (Bom.)
(विराट मानव, भाव पुष्पांजलि, देवदासी, जादूचा पंखा
आदि पुस्तकांचे लेखक)

REFBK-0008366
REFBK-0008366

— प्रकाशक —

महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई ४.

किंमत एक रुपया

: मुद्रक :
श्री. ना. अ. मेहेंदळे,
जीवन मुद्रणालय,
५५१ बुधवार, पुणें २.

सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन.

: प्रकाशक :
महाराष्ट्र ग्रंथ भांडार,
मुंबई ४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम 3154 वि: ...
क्रमांक 1570 नों: दि: 24/...
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क. (३५६)

# यज्ञाच्या वेदीवर—

यज्ञ म्हणजे त्याग, समर्पण, बलिदान! यज्ञ म्हणजे विश्व-प्रेम, विश्व-कल्याण, विश्वशांतीची जळती जागती तळमळ!! यज्ञ म्हणजे, "सर्वेपि सुखिनः सन्तु" या उत्कट ध्येयाची जळजळीत आग!!

आत्मोद्धार-विश्वोद्धार यांच्या जळत्या आकांक्षा मनीं बाळगून आजवर थोरामोठ्यांनीं भारतांत अनेक यज्ञ केले. त्या नरपुंगवांपुढें माझा कोण केवा. भूदानयज्ञ, श्रमदानयज्ञ अशा युगानुकूल महायज्ञांचे प्रवर्तक पूज्य विनोबाजींना आदरभावें वंदन करून मी हा 'अश्रु-यज्ञ' आरंभिला. यांत माझें असें कांहींच नाहीं. हा भारतीय मातीचा गुण आहे. भारतीय अमर संस्कृतीचा व मंगल अन्न-जलाचा हा प्रभाव आहे. ऋषि-महर्षींचा हा आशीर्वाद आहे.

आजवर धार्मिक व राजकीय हेतूंनीं यज्ञ करण्यांत आले. आतां युग बदललें आहे. आतां समाज व मानव-हितकारी यज्ञ हवे आहेत. विश्व विशाल होतें. त्यावेळीं हृदयें लहान होतीं. आतां विश्व लहान झालें असून हृदयावर विशाल होण्याची पाळी आली आहे.

'अश्रु-यज्ञ' हें अशाच विशाल हृदयाचें कर्म आहे. ज्याच्या मनाला कापट्य, अमंगलता व द्वेष शिवत नाहींत त्याच्याच डोळ्यांतून अश्रु येत असतात.

दुःख, द्वेष, भय, हर्ष, प्रेम शोक आदि भाव प्रगट करण्यास जेव्हां शरिरांतील इंद्रियें शिथिलता अनुभव करतात, तेव्हां त्यांचें कार्य अश्रु मोठ्या सोज्ज्वलतेनें पार पाडतात.

अपार सृष्टि वैभव आणि दुर्लभ नरदेह लाभूनहि जीवन पूर्णता पावलें नाहीं. पण द्रवल्या हृदयांतील या अश्रु-मौक्तिकांमुळें त्यांचें सार्थक झालें. तें पूर्णत्वास पोंचलें.

तिमिरास उजळण्याची व पापास पावन करुन घेण्याची अमोघ शक्ति अश्रूंत आहे. अश्रूंची भाषा मूक पण वाचावयास सरळ व सोपी आहे. कोणत्याहि देशाचा मनुष्य दुसऱ्या देशाची भाषा न शिकतांहि त्यास त्यांच्या आंसवांची भाषा उमगते ! आंसवांची जातकुळी एक व त्यास निर्मिणारा आत्माहि एकच याचा अनुभव व साक्षात्कार 'अश्रु–यज्ञा' मुळें होतो.

अश्रूंचा अर्थ म्हणजे जीवनाचा अर्थ. हा अर्थ कळतांच आत्मशांती व विश्व–शांतीचीं किरणें फांकूं लागतात. विनाश, विध्वंस, द्वेष, अणुगोल, हायड्रोजन बाँब या संहारी शक्तींचें धुकें वितळूं लागतें. सर्व दूर मंगलता पसरते ! आणी बाणीच्या प्रसंगीं सर्वनाशाच्या खाईंत कोलमडणाऱ्या जीवाला व विश्वाला सांवरण्याची दिव्य शक्ति म्हणजे "अश्रु–यज्ञ."

परवां पॅसिफिकमध्यें झालेल्या प्रायोगिक अणुस्फोटाविरुद्ध भारतानें जो विरोधी सूर काढला तो याचमुळें. कारण, भारत ही युगायुगांपासून विश्वमंगल अशा यज्ञांची भूमि आहे.

या 'अश्रु–यज्ञा' ची सांगता वाचकांच्या सहसंवेदनेवर अवलंबून आहे. या यज्ञासाठीं आपापल्या वेदनांचा हविर्भाग सर्वांनीं दिला तर यज्ञाची सांगता होऊन विश्वोद्धार होण्यास विलंब लागणार नाहीं. प्रत्येक मानवी मनांत ही सहसंवेदनेची भावना परिपुष्ट व्हावी हीच हार्दिक इच्छा.

सराफा, औरंगाबाद, (दक्षिण)
६–४–५४

शंकरलाल पुरवार

# पांचामुखीं परमेश्वर—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ........ क्रि. ........
क्रमांक ........ ग्रं. क्रि. ........

डॉ. शंकरलाल पुरवार हे आज प्रथमच कवि म्हणून पुढें येत आहेत असें नाहीं. त्यांनीं यापूर्वीं "विराट मानव" व "भाव–पुष्पांजलि" हीं आपलीं दोन काव्यें महाराष्ट्रीय रसिकांस सादर केलीं आहेत.

आज 'अश्रु–यज्ञ' हें तिसरें काव्य ते रसिकांपुढें ठेवीत आहेत. हें अप्रसिद्ध प्रदीर्घ काव्य मी समग्र वाचून पाहिलें. या काव्याचे एकंदर चार हविर्भाग आहेत आणि या भागांतून कवींनीं एकूण दोनशेंअकरा आहुति यज्ञास समर्पण केल्या आहेत. या काव्यास कवींनीं अष्टाक्षरी मराठी छंद योजिला आहे. त्याला ओंवी अथवा अभंग यांपैकीं कोणतेंहि एक नांव अथवा दोन्ही नांवें देतां येतील. काव्याची भाषा भारदस्त असली तरी सुबोध व सार्थ आहे. कवीच्या वाणींत ओघ आहे. त्यामुळें काव्य वाचतांना वाचक त्याबरोबर सहज वाहत जातो. रचनेंत प्रसाद असल्यामुळें फुठेंहि अडथळे आल्यासारखें किंवा अशळल यासारखें वाटत नाहीं. प्रसादाच्याच जोडीला प्रसंगांनुसार माधूर्य आणि ओज यांचा सन्निवेश झाला आहे.

डॉ. पुरवार यांच्या ठिकाणीं प्रतिभा आणि प्रज्ञा यांचा क्वचितच आढळणारा संयोग झाला आहे. निव्वळ भावनिक गीतें लिहिण्याकडे त्यांचा ओढा नाहीं. वैचारिकता हा त्यांच्या लेखनाचा आत्मा आहे. मात्र ही वैचारिकता भावनांचें शरीर धारण करून मग पुढें येते, त्यामुळें डॉक्टरांचे विचार असंदिग्ध, सुस्पष्ट व सुसंगत आहेत. यांत गुंतागुंत, अधुरेपणा, अपुरे-पणा किंवा विसंगति यांचा आढळ होत नाहीं. त्यामुळें ते बुद्धीला सहजगम्य होतात, आणि त्यांच्यावर भावनांचें झिरझिरीत आवरण असल्यामुळें तें अंतः-करणाला स्पर्श करतांनां रम्य वाटतात.

अश्रु म्हणतांच आपल्यापुढें विकल करुणा साकार होते. अश्रूंचा व रुदनाचा संबंध आहे. रुदन हें दुर्बलतेचें द्योतक आहे. जे कातर असतात ते रुदन करतात, अशी आपली समजूत आहे आणि त्यामुळें अश्रूंबद्दल आपल्यांत फारशी आपुलकी नाहीं. परंतु डॉ. पुरवार यांच्या या काव्यांत अश्रु या शब्दाचा वापर 'व्यापक प्रेमाचें परिपूर्ण प्रतीक' म्हणून केला आहे. समाजांत जे जे कोणी पीडित व शोषित असतील त्यांच्याविषयींची आतमीयता म्हणजे अश्रु. याच अश्रूंच्या जोरावर आजवर समाजांतील दलि-

तांचा गलितांचा उद्धार झालेला आहे. या अश्रूंनी रंजलेल्या-गांजलेल्यांना सहनुभूतीनें हृदयाशीं लाविलें आहे. सारांश, अश्रु हा दुबळेपणा, नेभळेपणा, अगर गबाळेपणा यांचा द्योतक नसून व्यापक सहकंप उदात्त, औदार्य आणि सर्वश्रेष्ठ बांधव्य यांचा व्यंजक आहे. प्रस्तुत काव्यांत, डॉक्टरांनीं हें तत्त्व काव्यमय केलें आहे.

या काव्याच्या पहिल्या दोन भागांत अश्रूंनीं जें उत्क्रांति व क्रांति-कार्य केलें त्याचें काव्यमय कथन आहे. आणि अश्रूंच्या प्रभावाचें आणि महात्म्याचें वर्णन आहे.

या कथनांत आणि वर्णनांत एखादें नवें तत्त्व गोवलें आहे असें मुळींच नाहीं. गेल्या जागतिक महायुद्धांत विमान, अण्वस्त्र, स्वर-संवाहक इत्यादि आविष्कारांचा जो दुरुपयोग करण्यांत आला आणि स्वतांची महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठीं ज्या राक्षसी हिंसक वृत्तीचें नग्न प्रदर्शन करण्यांत आलें, त्यामुळें प्राचीन संतांनीं उपदेशिलेल्या, मंगलता आणि मानवता यांच्या थोरवीची जगाला जाणीव झाली. या काव्यांत त्याच संतप्रणीत ध्येयांचा प्रचार आणि प्रसार आहे.

याव्याच्या तिसऱ्या विभागांत अठराव्या शतकांत फ्रांस देशांत जी रक्तरंजित क्रांति झाली तिचें अत्यंत सरस व सुंदर काव्यमय वर्णन आहे. डॉक्टरांनीं इतिहासासारख्या रुक्ष व शुष्क विषयाला यांत सजीव केलें आहे. पहिल्या दोन्ही विभागांपेक्षां हा विभाग विशेष सरस व रमणीय आहे. पहिल्या दोन विभागांत तत्त्वविवेचन आहे तें केवळ चिंतनीय आहे. तिसऱ्या विभागांत काव्यदर्शन आहे, तें रमणीय आहे, चौथा विभाग अति-शय त्रोटक आहे. तो उपसंहाराच्या स्वरूपाचा आहे.

शेवटीं, डॉ. पुरवार यांनीं, काव्यलेखनाला प्रतिकूल असा त्यांचा व्यवसाय असतांनाहि अशा प्रकारचें भावगंभीर काव्य निर्माण केलें, याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें आवश्यक आहे. डॉक्टरसाहेब यापुढेंहि असेंच लेखन करून महाराष्ट्र-शारदेचें वैभव वृद्धिगत करोत, अशी इच्छा प्रगट करून मी हा माझा अल्प अभिप्राय संपवितों.

अमरावती, विदर्भ
२१-१-५४

भ. श्री. पंडित
अध्यक्ष वि. सा. संमेलन
१९५३, खामगांव

महाठवाड्यांतील नामांकित कवि श्री. पुरवार यांचें 'अश्रु–यज्ञ काव्य वाचलें. या काव्यांतून पुरवारांच्या इतर काव्याचे विशेष, म्हणजे समाज–सुधारणेची तळमळ, अन्याय, विषमता, पिळणूक यांची चीड, हे प्रकर्षानें प्रकट झाले आहेत. सज्जनांच्या डोळ्यांतून अन्यायाविरुद्ध अश्रु वाहूं लागले कीं क्रांति झाल्याशिवाय रहात नाहीं; हें भारतीय प्राचीन वाङमयांतील वचन या ठिकाणीं आठवल्याशिवाय रहात नाहीं.

क्रौंचाचिये आसवांनीं । रामायण रचीयेलें ।
माय सीतेच्या आसवांनीं । स्वर्ण लंका केली ध्वंस ।
द्रौपदीच्या आसवांनीं । कौरवांचा केला नाश ।
भारताच्या आसवांनीं । नेताजींस निर्मीयेलें ।
जेथें सूर्य न लोपणें । तेथें सूर्या मालविलें ।

वरील ओळींवरून जुलमांचा जोर झाला कीं प्रतिक्रिया कशी भयंकर होते याचें सुंदर चित्र रेखाटलें आहे. डॉक्टर पुरवार यांच्या सर्वंच काव्यांतून पिळणूक, दांभिकपणा, जोरजुलुम यांसंबंधीं प्रखर भावना दिसून येतात. त्यांच्या 'विराट मानव' या ओजस्वी काव्यानें त्यांना महाराष्ट्रांतील प्रमुख कवींच्या रांगेंत मानाचें स्थान मिळवून दिलें. तीच परंपरा त्यांनीं या वरील काव्यांत चालूं ठेविली आहे. मराठवाड्यांतील या क्रांतिकारी कवीच्या या काव्यामुळें मराठी वाङमयांत मोलाची भर पडली आहे.

५–४–५४
हैद्राबाद (दक्षिण)

–सेतुमाधवराव पगडी
अध्यक्ष, मराठवाडा सा. संमेलन
हैद्राबाद. (दक्षिण.)

माझे मित्र मराठवाड्यांतील विख्यात कवि डॉ. शं. जा. पुरवार यांचा हा तिसरा काव्य प्रबंध. विराट मानव व भाव पुष्पांजलि या त्यांच्या यापूर्वी प्रकाशित झालेल्या काव्य प्रबंधांनीं कवि या नात्यानें जी मान्यता त्यांना मिळवून दिली ती या त्यांच्या नवीन काव्य प्रबंधामुळें दृढ व द्विगुणित होईल याबद्दल मला खात्री वाटते.

'अश्रु' हा कवीचा आवडता विषय आहे, असें म्हटल्यास चूक होणार नाहीं. इंग्रजीपैकीं टेनिसन् यानें आणि मराठीपैकीं टिळक यांनीं अश्रूंचा महिमा वर्णन करणाऱ्या सुंदर कविता लिहिल्या आहेत. त्या कवितांतील कल्पनांपासून जरी पुरवार यांना स्फूर्ति मिळालेली नसली तरी त्यांचें हें छोटें खंडकाव्य कांहीं बाबतींत टेनिसन आणि टिळक यांच्या कवितांना पूरक ठरेल असें वाटतें.

डॉ. पुरवार यांनीं आपल्या काव्यांत अश्रूंचा महिमा टेनिसन आणि टिळक यांच्याप्रमाणें प्रीतीचा किंवा वात्सल्याचा निदर्शक म्हणून वर्णन केलेला नाहीं, तर क्रांतीचा प्रवर्तक म्हणून इर्षेनें गायिलेला आहे. त्यांचा 'अश्रुयज्ञ' हा वैयक्तिक नाहीं, तर जगांतील शोषित आणि दलित अशा जनतेच्या दुःखाचा, त्यागाचा व बलिदानाचा प्रतीक असा तो सामुदायिक 'अश्रु–यज्ञ' आहे. त्या दृष्टीनें त्यांनीं या काव्याच्या निरनिराळ्या भागांना 'हवि' असें जें नांव दिलें आहे तें अर्थपूर्ण वाटतें. विशेषतः फ्रेंच राज्यक्रांतीचा जो उपयोग त्यांनीं या काव्यांत केला आहे तो अतिशय समर्पक आणि हृद्य वाटतो.

या काव्यांत ओघ, ओज आणि आवेग हे जसे प्रतीत होतात तशीच तरल कल्पकताहि जागोजाग प्रत्ययाला येते.

क्रौंचवधापासून तों फ्रेंच राज्यक्रांतीपर्यंत ज्या ज्या घटनांचा उल्लेख आणि उपयोग डॉ. पुरवार यांनीं रस-परिपोषणार्थ केला आहे तो कवीच्या कल्पनाशक्तीची झेंप किती अचुक आणि पल्लेदार आहे, याची साक्ष देतो.

हृदयंगम कल्पना, व मार्मिक दृष्टांत यांनीं नटविलेलें डॉ. पुरवार यांचें हें नवें खंडकाव्य रसिकांच्या आदराला पात्र होईल अशी मला उमेद वाटते.

'प्रसाद'
नागपूर, १५–२–५४

ग. त्र्यं. माडखोलकर
माजी अध्यक्ष. म. सा. संमेलन

श्री. डॉ. शंकरलाल पुरवार हे मुरलेले कवि आहेत. त्यामुळें त्यांची रचना ओघवती आणि कल्पना बहुल असावी हें साहजीकच आहे. पण माझ्या-सारख्या सामान्याला ज्या कल्पनांतून फक्त परिहासच सुचावा त्यांतून त्यांनीं एक गंभीर तत्त्वज्ञान काढलें आहे, हें त्यांच्या काव्यात्म प्रतिभेचें लक्षण आहे.

हें तत्त्वज्ञान साध्या, सरळ, नादमधुर भाषेंत तसेंच स्पष्टपणें काव्यांत मांडण्यांत आणि आपल्या वैचारिक भूमिकेला जड सामान्य विलोभनापासून दूर ठेवण्यांत त्यांचा कडकडीत सोंवळेपणाच दिसून येतो. "रडा रडा जयें होई। आत्मोद्धार विश्वोद्धार।" असें जेव्हां ते म्हणतात, तेव्हां पहिल्यानें हसूंच येतें. पण संपूर्ण काव्य वाचल्यानंतर हें त्यांचें रडणेंसंतांचें रडणें, व्यापक प्रेमाचें आणि समतेचें सहानुभूतीचें प्रतीक आहे हें पाहून पुन्हां हसूं येतें. पहिलें हंसणें नैसर्गिक क्रीडाभावाचें आणि दुसरें हंसणें आपण फसलों या जाणिवेचें. काव्य वाचून विचार प्रवण मन प्रसन्न झाल्याचें द्योतक आहे.

डॉ. पुरवार यांचा काव्यानंद आमच्या सामान्य काव्यानंदाहून वेगळा आहे. हा वेगळेपणा हाच त्यांतील विशेष आहे.

हैद्राबाद
१६-११-५५

दिवाकर कृष्ण केळकर
अध्यक्ष, मराठी सा. संमेलन, लातूर.

माझे मित्र डॉ. शंकरलाल पुरवार यांच्या काव्याचा कित्येक वर्षांचा माझा परिचय आहे. त्यांच्या काव्यांचे विषय भव्य आणि भरदार असतात. त्यांचें 'विराट मानव' हें काव्य पुष्कळांनीं वाचलें असेल. या 'अश्रुयज्ञ' काव्याचा विषयहि असाच भव्य आणि जागतिक महत्वाचा आहे. या काव्यांत प्रतिमा जुन्याच असल्या तरी आंसवांची शक्ति आणि माहति जळजळीत भाषेंत इतिहासांतले अनेक दाखले देऊन कवीनें वर्णन केली आहे. अन्नान्न दशा झालेल्या प्रजेच्या आंसवानीं फ्रांन्समध्यें क्रांतीचा डोंब कसा पेटवला हें सांततांना कवि म्हणतात.

आग विझतां चुलींत
आग पेटली पोटांत ।
मनीं उठले उफाळ.
ज्वाळ उठले कृतौंत ।
आग राहे पाण्यांत ही
मग आसूंनी दाविलें ।
घरें पेटती पाण्यानें
आसवांनी सिद्ध केलें । "

'अश्रु-यज्ञ' हें काव्य अशा प्रकारचें आहे. डॉ. पुरवार यांच्या अव्यभिचारी काव्यसेवेचें कुणीहि अभिनंदनच करील.

**अनंत काणेकर.**
२३।४।५७

ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३९५९८ दि: आण्
क्रमांक ९५४० नों. दि: २५/११/५१

# 'अश्रु-यज्ञ'

## अनुक्रमणिका



| | |
|---|---|
| (१) यज्ञाच्या वेदीवर–डॉ. पुरवार | ३ |
| (२) पांचामुखीं परमेश्वर...... | |
| ★ श्री. भ श्री. पंडित | ५ |
| ★ श्री. सेतु माधवराव पगडी | ७ |
| ★ श्री. ग. त्र्यं. माडखोलकर | ८ |
| ★ श्री. दिवाकर कृष्ण केळकर | ९ |
| ★ प्रो. अनंत काणेकर | १० |
| (३) हवि पहिला | १३ |
| (४) हवि दुसरा | २२ |
| (५) हवि तिसरा | २९ |
| (६) हवि चवथा | ४६ |


★

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. 12801

# अश्रु-यज्ञ


## (हवि पहिला)



जय अश्रु-दान-यज्ञ । क्रान्ति-उत्क्रान्तीच्या देवा ।
तुझ्या चरणीं एवढी । रुजू होऊं देईं सेवा ।।


मंगलता मानवता ।
सन्ताचिया परित्राणा ।
धर्माचिया ग्लानीसाठीं ।
दुष्कर्माच्या विनाशना ।। १
गलितांना द्याया बळ ।
दलितांच्या उत्थापना ।
भुकेल्यांना अन्नोदक ।
द्याया, दीना संरक्षणा ।। २
-धैर्यहीना द्याया धीर ।
तृण व्हाया वज्रासम ।
जीवनांत संचराया ।
नवें रक्त नवा जोम ।। ३
सर्वां सुखी पहावया ।
भेदभाव जाळावया ।
झोपलेले जागवाया ।
दुःखासवें झुंजावया ।। ४

जीर्णशीर्ण मृत विश्वा ।
संजीवनी पाजावया ।
'अश्रु–यज्ञ' आरंभिला ।
दुरितांना नाशावया ॥ ५
या घेउन सकळीक ।
तरी हवि आपुलाले ।
'अश्रु–यज्ञें' युगें युगें ।
बुडल्यांना तारीयलें ॥ ६



आसु काळ भैरवास ।
चला नमूं या, या काळीं ।
वक्षीं शोभे रुण्डमाळा ।
रक्त मळवट भाळीं ॥ ७
विश्व व्यापी तनु भव्य ।
तेजोमय विकराळ ।
श्वासांतून प्रळयाचे ।
रुद्र उठती उफाळ ॥ ८


अगणित हाथ त्याला ।
त्यांत खप्पर नि शस्त्रें ।
रूप घोर रुद्राहून ।
बहुमुखीं बहु अस्त्रें ॥ ९
स्वर चण्ड नभ भेदी ।
खगोलास हादरा दे ।
चाले नित नमवीत ।
भूमि दणकट पदें ॥ १०

दंष्ट्रा कराळ विक्राळ ।
जिव्हा लाल लालायित ।
नेत्र अंगार वर्षती ।
दुष्ट दैत्य संहारीत ।। ११
भक्षावया पाप ताप ।
दुःशासन अत्याचार ।

सिंहासनें सम्राटांचीं ।
रक्त रंजित अपार १२

दुरभिमान भक्षावया ।
नरमुण्डें गर्वोन्नत ।
शमवाया तृष्णेलागीं ।
दानवांचें उष्ण रक्त ।। १३
तरी आसवांचा देव ।
नमूं चराचरीं कीर्ति ।
आसु रक्ताचे बनतां ।
साक्षात्कार सर्वांभूतीं । १४

–पाप क्षाळनास चला ।
नमूं दुबळचांची शक्ति ।
–घालूं लोटाङगण पदीं ।
–पावूं वरदाना प्रति । १५
–तरी याहो याहो सारे ।
हवि अर्पाया अपुले ।
मनोवांच्छितास युगा ।
आसु देवरायें दिले ।। १६

“ अश्रु–यज्ञें ” विश्वामाजीं ।
नित केली महाक्रांति ।
दुराचार जाळोनियां ।
प्रस्थापिली दिव्य शांति ॥ १७
‘ अश्रु–यज्ञा ’ आसु द्या हो ।
आसु सुख सर्वां लाहो ।
महायज्ञ आसवांचा ।
घरोघरीं होऊं द्या हो ॥ १८



सत् चित् आणि सुन्दर हो ।
आसुदानें वसुन्धरा ।
दारीं येई भिक्षेकरी ।
आसवांनीं झोळी भरा ॥ १९
दुष्ट घालिती बन्धन ।
जरी कर्म वाचेवरी ।
हृदीं आसूंचें इन्धन ।
त्याशीं जाळावया परी ॥ २०

गिरी दुलंघ्य लंघीती ।
आसु संतें बोधियेले ।
प्रल्हादाच्या आसवांनीं ।
दानवाशीं नमवीलें ॥ २१
रडा रडा तरी जसा ।
रडलासे ध्रुव गुणी ।
हिंस्त्र पशु, नर, गेले ।
विष, वैर, विसरोनी ॥ २२


आसु देखतां लोचनीं ।
दूर क्रूरता पळावी ।
पाप वासना चिरून ।
देवी शुचिता जागावी ।। २३
रडा रडा जयें होओी ।
आत्मोद्धार–विश्वोद्धार ।
छिन्न भिन्न जीवनास
आत्मशक्ति साक्षात्कार ।। २४

आसु देतां, आसु घेतां ।
द्वेष सरे, प्रेम वाढे ।
घडे आत्म्याची ओळख ।
जीवा–शिवा तेज चढे ।। २५
आसु विनिमयावरी ।
बन्धनास कोण घाली ।
आणि रोधावया त्यास ।
जगीं कोण शक्तिशाली ।। २६

आसवास भीति नसे ।
जुल्मी यांची क्रूरांची ।
अग्नि ओकणारे नेत्र ।
नभ–भेदी गर्जनांची ।। २७
आसवांस भीति नसे ।
दण्डुक्यांची, बन्दुकांची ।
लुळी शक्ति तया पुढें ।
अणुगोल विज्ञानांची ।। २८

नदीसम आसवांचा ।
जरी उगम लहान् ।
थेंबें थेंबें तळें सांचे ।
होई सागर महान ॥ २९

जगीं आसवांचा लोण्ढा ।
कधीं कोणीं थोपविला ।
धुन्द फुन्द महापूर ।
कधीं कोणीं उल्लंघिला ॥ ३०



स्वतंत्रता अनिर्बन्ध ।
आसवांची भूमीवर ।
वांकतात आसुपुढें ।
थोर राजराजेश्वर ॥ ३१

म्हणोनियां नच भीतां ।
आसुदान करा करा ।
'अश्रु-यज्ञ' पुण्य कर्म ।
विश्व सारें भरा भरा ॥ ३२


आसुदान जगीं नोव्हे ।
येरा गबाळाचें काम ।
भीरु, दीन, नेभळट ।
नव्हे निर्बुजांचा धर्म ॥ ३३

आसु यांचे जगीं ढोंग ।
स्वार्थासाठीं सारें सोंग ।
नक्राश्रूंनीं मानवांचे ।
कधीं फेडियेले पाङग ॥ ३४

जन्म झाला विज्ञानाचा ।
जग सुखी करावया ।
सत्तेसाठीं धनिकांनीं ।
परी राबवीलें त्याला ॥ ३५
हिरोशिमा, नागासाकी ।
काळें लागलें विज्ञाना ।
पीयुषाचें झालें विख ।
हळहळली करुणा ॥ ३६

जनदुःखें अंतराचे ।
शत शत खण्ड झाले ।
पाप अधर्मे अन्यायें ।
रक्त शीतल तापलें ॥ ३७
सुप्त जागलें कर्तव्य ।
आणि रडलें अन्तर ।
बुद्ध लोचनांत आसु ।
ओघळले भराभर ॥ ३८

देवकीच्या आसवांनीं ।
कंसकाळ निर्मियेला ।
आसु—दान देतां क्षणीं ।
गजराज मुक्त झाला ॥ ३९
दास्य बन्ध तोडावया ।
शिवें केलें आसुदान ।
हिन्दुपत पादशाही ।
मग दिली प्रस्थापून ॥ ४०



ख्रिस्ताचिये आसुदानें ।
मेघ काळे उजळीले ।
गांधींचिया आसुदानें ।
भारताचें सोनें झालें ।। ४१

अज्ञांचिया आसुदानें ।
जग जीवन पावन ।
विश्व शापहि शमला ।
नर झाला नारायण ।। ४२

सर्व दानांमाजी श्रेष्ठ ।
आसुदान भूमीवरी ।
श्रमदान भूमिदान ।
रूपें त्याचींच गोजिरीं ।। ४३

विद्यादान, धनदान ।
आसुदान यांचा प्राण ।
व्यर्थ सारें दान लोकीं ।
आसु अभिषेकावीण ।। ४४

प्रक्षोभक ज्वालामुखी ।
जागतसे अश्रु–यज्ञीं ।
श्रेष्ठ महा आसुदान ।
क्षुद्र मानव जीवनीं ।। ४५

म्हणोनियां संघटित ।
आसुदान करा करा ।
अमंगल धुवोनियां ।
मंगलता जगीं भरा ।। ४६

परामूत मनीं तीव्र ।
वीज मेघ गर्जतात ।
अशुभता लया न्याया ।
घोरन्दर वर्षतात ॥ ४७

असे आसु जगामाजी ।
रणशिंग संघर्षाचें ।
शुभ आदेश संदेश ।
वैफल्यांत साफल्याचे ॥ ४८


म्हणोनी न आसुदान ।
येरा गबाळाचें काम ।
आसु जागृतीची खूण ।
आसु चैतन्याचें धाम ॥ ४९

जय आसुदान–यज्ञ ।
क्रांति उत्क्रांतीच्या देवा ।
तुझ्या चरणीं एवढी ।
रुजूं होवो नम्र सेवा ॥ ५०

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र.
शाखा

# ‘ अश्रु-यज्ञ ’

## (हवि दुसरा)



आसु जीवनाचे संगीं ।
आसु भवितव्या रंगी ।
कर्तव्य पथ चुकतां ।
नीज नयनींची भंगी ।। १

ढगाळकीत जीवनांत ।
सप्तरंग आसु भरी ।
भावपूर्ण राग छेडी ।
सुख–दुःख वीणेवरी ।। २

आसुवीण विश्व सुनें ।
पाप पुण्य सारें उणें ।
तप्त जीवन असह्य ।
आसुवीण दुःख दुणें ।। ३

आसु जीवनाचा सखा ।
पीडितांचा पाठीराखा ।
रुक्ष भकास जीवना ।
आसु सुवर्णाची रेखा ।। ४

आसु शुद्ध–बुद्ध सन्त ।
आसु आयुष्याची जोडी ।
जीर्ण जीवनाचा अन्त ।
आसु जीवनाची गोडी ॥ ५

आसुवरी जीव जगे ।
आसुवरी विश्व तगे ।
अरुवार आसुजाळीं ।
गुन्तलेले प्रीति धागे ॥ ६

आसु भोग, आसु त्याग ।
आसु राग, अनुराग ।
अनुष्ठान उपासना ।
आसु जीवनाची जाग ॥ ७

आसवांचें भिन्न कर्म ।
आसवांचे भिन्न धर्म ।
आत्म समर्पणीं लाभे ।
खऱ्या आसवांशीं शर्म ॥

आसवांचे रंग नाना ।
आसवांचे ढंग नाना ।
सन्त शूर धीरा पोटीं ।
आसवांचा श्रेष्ठ बाणा ॥ ९

संघटीत ' अश्रु–यज्ञ '।
म्हणोनियां करा करा ।
आसवांच्या शुद्ध मंत्रें ।
विश्व सकल श्रद्धरा ॥ १०

आसु अनुकम्पा दया ।
आसु करुणेची काया ।
समाधान प्रसन्नता ।
आसु उजुतेची छाया । ११
आसु दया क्षमा शांति ।
आसु देवतेची मूर्ति ।
अभियुक्ता शुचि दण्ड ।
पुण्य पावनाची कीर्ति ।। १२

आसु कोमलाङ्गी माया ।
सुख समाधान पाया ।
संधिकाळ सौभाग्याचा ।
पश्चात्तापें शुद्ध व्हाया ।। १३
आसु रत्न आसु कान्ति ।
नेत्र शिम्पांतील मोती ।
अनुतापें पेटलेल्या ।
तेजःपुंज दिव्य ज्योति ।। १४

आसु आकाशींचे तारे ।
तिमिरासी नाशणारे ।
त्रस्त जीवन, पान्थस्था ।
तेज धैर्य ओपणारे ।। १५
आसु प्रीति अनुभूति ।
ध्येय आग, अभिव्यक्ति ।
खलमना दापणारी ।
मदु तेजोमय शक्ति ।। १६


आसु कारुण्याची कथा ।
आसु दारुणशी व्यथा ।
अखण्डित दीप–माळ ।
उजळाया ध्येयपथा ॥ १७
संघटीत ' अश्रु–यज्ञ ' ।
म्हणोनियां करा करा ।
आसवांच्या समर्पणें ।
हसूं फुलूं द्या ही धरा ॥ १८

० ० ०

आसु धन दारिद्र्याशीं ।
पीडितांचा अभिमान ।
अवमाना वरदान ।
मांजल्याचें आशास्थान ॥ १९
आसु जगीं आग–पाणी ।
मऊ मुग्ध फुलावाणी ।
भेदी वज्र, पाषाणाला ।
शोभा वसन्ताची आणी ॥ २०

आसु खारे, खारेपण ।
खेळे नसानसांतून ।
कुणा जाळी, कुणा पोळी ।
आणि भाग्य परतून ॥
आसु हंसे आसु रुसे ।
आसु ब्रह्माण्डांत वसे ।
ओघळतां घळघळा ।
जगा लावी आसु पिसें ॥ २

अन्तराच्या आकाशांत ।
वेदनांचे मेघ दाट ।
घळघळां वितळतां ।
स्फुरे पराक्रम लाट ॥ २३
मग जीवन मोहरे ।
हसे फुले नानापरी ।
मातीमाजी पिके सोनें ।
समृद्धीनें विश्व भरी ॥ २४



पौरुषाच्या वक्षावरी ।
शोभतसे अश्रु–माला ।
आसु निष्क्रीयता अन्त ।
मोहरवी कर्तृत्वाला ॥ २५
आसु वेदनांचे दूत ।
आसु भग्न मनोरथ ।
आसु आत्मग्लानी हारी ।
आसु अभिलाषा रथ ॥ २६

आसु सत्य, सुदर्शन, ।
मृदुलता, मकरंद ।
आसु गोड जादुगिरी ।
आत्मानंद, ब्रह्मानंद ॥ २७
भंगलेल्या भावनांना ।
आसु अमृताची धार ।
देवतांचा आशीर्वाद ।
आसु सुमनांचा हार ॥ २८

आसु न्याय, आसु नीति ।
आसु जगताची रीति ।
आसु भाग्याचा विधाता ।
आसु मूक भाव गीति ॥ २९

आसु विश्व-शांति धर्म ।
आसु महायज्ञ कर्म ।
घायाळल्या हृदयाला ।
हिमसेक सुख शर्म ॥ ३०

आसु विश्व इतिहास ।
हास आणि उपहास ।
अतिताची गुप्तलिपी ।
भविष्याचा मधुमास ॥ ३१


आस धर्म भेदातीत ।
एक त्याची जात गोत ।
अन्तरींच्या आसवांची ।
विश्वांतरीं एक जात ॥ ३२

आसु बिनतारी यंत्र ।
वास त्याचा वाऱ्यावरी ।
आसु जगताची साऱ्या
क्षणार्धांत यात्रा करी ।

आसु वेदनांची आशा ।
स्फूर्तिदायक कहाणी ।
भाव मूक, एक भाषा ।
आसु भविष्याची वाणी ॥ ३४

या देशांतील वेदना।
करी देशा त्या पीडित।
अनुभूति, संवेदना।
होती झंकृत जागृत ॥ ३५

आसु पीडा परिहार।
दुःख टांगी वेशीवर।
गोळा करी गोतावळा।
समदुःखी अनिवार ॥ ३६




आसवांचा गोतावळा।
अन्दाजिला नाहीं ज्यांनीं।
निजकरें आपुलेंच।
अनहित केलें त्यांनीं ॥ ३७

एका एका आसवांत।
लाख लाख रुद्र कथा।
सहस्रसे मनोवाजी।
जुम्पलेले ध्येय-रथा ॥ ३८

एका एका निःश्वासांत।
प्रळयांचा चमत्कार।
नव यौवन, शक्तींचा।
नवा नवा आविष्कार ॥ ३९

# अश्रु-यज्ञ

## (हवि तिसरा)




आसु असुरांचें पाप ।
आसु राक्षसांचा ताप ।
व्यभिचार, अनाचार ।
जुलमांचें मोजमाप ।
दुष्ट दैत्य दानवांसी ।
आसु जगीं महाशाप ।
आसु जन्मदात्यालागीं ।
महाकाळ, महाताप ॥ २

आसु रुद्रा निमंत्रण ।
नळयाशीं आमंत्रण ।
अत्याचारा नियंत्रण ।
अबलांचें संरक्षण ॥ ३
आसु पङ्खहीन पक्षी ।
किलबिल करी वक्षीं
आसु परिवर्तनाचा ।
उषःकाल तम भक्षी ॥ ४


आसु क्रिया-प्रतिक्रिया ।
आसु पोटीं राजकाज ।
दुर्जनांचें, शासितांचें ।
पारिपत्य, विषबीज ॥ ५
म्हणोनियां जग सांगे ।
" रडूं नका, रडूं नका " ॥
खाऱ्या आसवा भिअन ।
-शांतवीती मना फुका ॥ ६

० ० ०



दानवांच्या आकांक्षाना ।
आसवांनीं चुरडीलें ।
रत्नमय मुकुटांना ।
सिंहासनां ठोकरीलें ॥ ७
क्रौंचाचियें आसवांनीं
रामायण रचियेलें ।
वाटमाऱ्या वाल्मिकीला ।
महर्षींच्या पदीं नेलें ॥ ८
माय सीतेच्या आसवांनीं ।
स्वर्ण लंका केली ध्वंस ।
द्रौपदीच्या आसवांनीं ।
कौरवांचा केला नाश ॥ ९
मावळ्यांच्या आसवांनीं ।
शिवबास जन्म दिला ।
'हर हर' महादेव ।
जड सह्याद्रि गर्जला ॥ १०

भारताच्या आसवांनीं ।
नेताजींस निर्मियेलें ।
जेथें सूर्य न लोपणें ।
तेथें सूर्या मालवीलें ।। ११
गगनींच्या आसवांनीं ।
वनश्रीला हसवीलें ।
खाऱ्या सागराच्या पोटीं ।
शुद्ध मोती निर्मियेले ।। १२




बाळ आसूनीं ममता ।
मायपोटीं जागवीली ।
पान्हा फुटतां प्रीतीचा ।
सृष्टि अमर जाहली ।। १३
आसवांनीं करुणेची ।
रम्योद्यानें फुलवीलीं ।
युगें युगें ज्वालामुखी ।
रणचण्डी जागवीली ।। १४

आसु निर्मी इतिहास ।
मिटवीत दुष्ट त्रास ।
कंगालाच्या कुटीमाजी ।
खेचीतसे समृद्धीस ।। १५
जग स्वार्थी तरी सांगे ।
"रडूं नका, रडूं नका ।"
पीडितांच्या आसवांत ।
राजे, धनिकांना धोका ।। १६

आसवांचा अवतार।
नच शुष्क होण्यासाठीं।
मिसळून मातीमध्यें।
विरुनियां जाण्यासाठीं ॥ १७

पाहणें न सार्थकता।
गुपचिप घळघळा।
फुटोनियां अंतराळीं।
ओघळणें भळभळा ॥ १८



आसवांचा जन्म नसे।
वाफमय होण्यासाठीं।
दुःख मेघीं झळकून।
तमीं लुप्त होण्यासाठीं ॥ १९

रक्तांकीत रणांगणें।
आसवांत क्रांति रणें।
महानाश, रुद्रालागीं।
लक्ष लक्ष निमंत्रणें ॥ २०

म्हणोनियां जग सांगे।
"रडूं नका, रडूं नका"।
हुंदक्यांत हुंकारतो।
कळि काळ क्रूर निका ॥ २१

० ० ०

वेदनांची मादकता।
नेत्र करी लाल बुन्द।
लोपे सहनशीलता।
तडतडा तुटे बन्द ॥ २२


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम अश्रु-यज्ञ ३९५४८ वि: ......
क्रमांक ९५४० नों: दि: ......

गांजलेला भुकेलेला ।
मग काय नच करी ।
गळचेपीनें असह्य ।
हो अुदार प्राणावरी ॥ २३
फ्रान्समध्यें आसवांनीं ।
क्रान्ति केली शान्ति दिली ।
भूक बळी पडण्याची ।
जेव्हां तेथें पाळी आली ॥ २४

वज्र आसूंत कडाड ।
वीज घोर गरजली ।
नृप पात्यांनीं साम्राज्यें ।
रसातला लागी नेलीं ॥ २५
होता तेथें राजा अेक ।
होतें त्याचें दुःशासन ॥
होता प्रजेस छळीत ।
नवे कायदे काढून ॥ २६

सुखदुःखांच्या तयांच्या ।
दाद घेतसे कधीं न ।
नित प्रजेस लुटीत ।
छळ तयांचा मांडून ॥ २७
रंजल्याचा, गांजल्याचा ।
पैसा निढळया घामाचा ।
होता वसूल करीत ।
घास ओढून मुखींचा ॥ २८


त्रस्त होती प्रजा सारी ।
कुणी कैवारी नव्हता ।
" राजा तसे अधिकारी ।
बोल कुणास लावित ॥ " २९
पीडिलेली प्रजा दीन ।
राजालागीं विनवीत ।
अर्जावरी अर्ज नाना ।
होती विनयें धाडीत ॥ ३०



" लाज झांकण्यापुरतें ।
वस्त्र द्या हो, अन्न द्या हो ।
आणि आमच्याकडून ।
श्रम काम पूर्ण घ्या हो ॥ ३१
अन्न अन्न करोनियां ।
बाळें मरती उपाशी ।
राजे तुम्हींच आम्हां वे ।
आम्ही जावें कुणापाशीं ॥ " ३२


परी अर्ज वाचावया ।
होते कोण जागे, जागीं ।
ऐकावया विनवण्या ।
होता वेळ कुणालागीं ॥ ३३
त्या अर्जांना मिळतसे ।
रोज केराची टोपली ।
फोल मोर्चेहि ठरले ।
कष्टी जनता जाहली ॥ ३४

अन्न कण न कुटींत ।
होती पोटांत कहाळी ।
परी पक्वान्नांच्या पंक्ती ।
होत्या अुठत महालीं ।। ३५
वरसाअीच्या नगरीं ।
अैटदार प्रासादांत ।
सोन्या मोत्यांच्या झालरीं ।
होता भूपति रहात ।। ३६



लोकां नसे अन्न खाया ।
येथें पडे अन्न सडा ।
येथें विलासा ये पूर ।
तेथें ओल्या नेत्र कडा ।। ३७
येथें अलोट ढिगार ।
संपत्तीचे वैभवाचे ।
होते अुडत फवारे ।
अत्तराचे, विनोदाचे ।। ३८
कुणी सौंदर्य-शालिनी ।
स्वर किन्नरी कोकिळा ।
होत्या छेडीत पियानो ।
गात मधुर गानाला ।। ३९
मुसमुसली यौवनें ।
गौरवर्णी सुकुमार ।
होत्या नाचत नर्तकी ।
धुन्द फुन्द अनिवार ।। ४०

वृन्द सङ्गीताच्या घोषें ।
होती मैफिल रंगत ।
साज साजिन्दे संगीत ।
होता प्रासाद गुंगत ॥ ४१
मदमात्या विलासिनी ।
स्वर्ण सुरायासधून ।
उंची पाजीत मदिरा ।
प्याले रत्नांचे भरून ॥ ४२



नाद मधुर प्याल्यांचा ।
होता नशा वाढवीत ।
मस्ती, मद नि कैफाचा ।
होता पारा चढवीत ॥ ४३
रुणुझुणु, रुणुझुणु ।
मंजु नूपुरांचा नाद ।
रत्न जडित कंकणें ।
देत होतीं त्याला साद ॥ ४४

नाच गात मदिरेनें ।
येओ शृंगारास ऊत ।
धुन्द फुन्द त्या लोचनीं ।
होती खुमारी खेळत ॥ ४५
उंची सुरा शरबती ।
नयनांत तरंगत ।
वीट वीट महालाची ।
होती संगीत बोलत ॥ ४६

बेहभान तें कुणाला ।
होता कवण शुद्धींत ।
" मेरे साथ नाचो राणी " ।
कोणी होता बरळत ॥ ४७

राजाराणी नृत्यामाजीं ।
होते रंगले दंगले ।
राजधर्म विसरून ।
होते ऐषांत गुंगले ॥ ४८

वरसाओस या परी ।
ऐश्वर्याचा निघे धूर ।
होता लोटत परंतु ।
–झोपड्यांत आसु पूर ॥ ४९


विषमता ती पाहून ।
तीव्र आणखी कोणती ।
तोल सुटतां रहावी ।
कशी आडेग धरित्री ॥ ५०

स्वप्नीं अन्नाचा न कण ।
प्रजा झाली सारी त्रस्त ।
" भाकरी द्या, भाकरी द्या. "
होती बाळें ओरडत ॥ ५१

निज खपाटीं पोटाशीं ।
माय छकुलें लावून ।
होती नाथा विनवीत ।
" द्या हो कुटका आणून ॥" ५२

माता–पिता वृद्ध दीन ।
होतीं आसवें ढाळीत ।
जठराग्नि शान्तवाया ।
होतीं आंवढा गिळीत ॥ ५३

जठरानल बाळांचा ।
करी व्याकुल आईला ।
आग पत्नीच्या पोटींची ।
भिडे पति अन्तराला ॥ ५४



मनीं संघर्ष माजतां ।
आसु ठिणग्या उडत ।
" अश्रु–यज्ञ " चेतवाया ।
होत होत्या संघटीत ॥ ५५

जेथें तेथें मनोमनीं ।
असंतोष धुमसत ।
घराघरांतून लोट ।
तप्त आसूंचे लोटत ॥ ५६

आसु आग पिउनीयां ।
लाखों मशाली पेटल्या ।
नाना शस्त्रास्त्रें घेऊन ।
वरसाओस निघाल्या ॥ ५७

" अन्न द्या हो, अन्न द्या हो " ।
कुणी आरोळ्या ठोकीत ।
ओढा राजा तख्ताखालीं ।"
कुणी कर्कश गर्जत ॥ ५८


खाया झाडपाला कोणी ।  
चराचराशीं मागत ;  
ठावठिकाणा अन्नाचा ।  
जडाजडाला पुसत । ५९

अेक दुःखी आअी पुसे ।  
मार्गीं दिसल्या तरुला ।  
"फळ अेक तरी देअी ।  
माझा अुपाशी छकुला" ॥ ६०

लोटीतसे तिज दूर ।  
परी रक्षक तेथला ।  
बाळ दुःखें वेडी पिशी  
मग पुसे पांखराला ॥ ६१  
"बोल बोल रे पोपटा ।  
कुठें बाग बहरली ।  
कुठें फळें सुधारसें ।  
टचटच ओथंबलीं ॥ ६२

बाळ भुकेलें जाहलें ।  
भूक भागवूं कशानें ।  
घरीं रित्या अुतरण्डी ।  
डोळां दिसती न दाणे ॥ ६३  
दांत दांताशीं घाशीत ।  
अुभें जीवन चाललें ।  
अंकावरी रडे बाळ ।  
अंतराळीं आहाळलें ॥ ६४

पोटीं आगीचा डोम्बाळा ।
स्तनीं पीयूष कोठलें ।
शुष्क पिशव्या चोखून ।
बाळ बेशुद्ध जाहलें ॥ ६५
नेत्रीं खारा अश्रु-पूर ।
कोठें मोतियांचा चारा ।
सोनकळी कोमेजते ।
तप्त किरणांचा मारा ॥ ६६



बोल बोलरे पोपटा ।
कुठें फळें अमृताचीं ।
काय सुवासानें त्याच्या
भूक शमेल बाळाची ॥ " ६७
राबराबून संतत ।
अन्नकण न लाभला ।
अेक कष्टी जीव पुसे ।
" सांग सांगरे चंडोला ॥ ६८

नित तुज राबवून ।
तव स्वर्ग-संगीताचें ।
मोल दिलें का जगानें ।
त्वदालाप विलापाचें ॥ ६९
सुषमित कपोलांचे ।
पेले भरून सुधेनें ।
मुक्त हस्त लुटवीलें ।
सर्व जगा बालकानें ॥ ७०

खाणें–पिणें सुख अल्प ।
परी बाळा न लाभलें ।
कुणीं गोकर्ण भरून ।
–दूध त्याशीं न पाजिलें ॥ ७१
कुबेराचा धनी बाळ ।
सर्व बोलले डौलानें ।
दुखणाओत जर्जर ।
झालें दारिद्र्य तापानें ॥ ७२

बाळावीण अिन्द्रवाडा ।
सुना भयाण वैराण ।
भूमि अन्थराया वरी ।
आकाशाचें पांघरूण ॥ ७३
बाळापुढें सम्राटांच्या ।
वैभवा न मातब्बरी ।
पळीभर अन्ना झालें ।
भिकाऱ्याहून भिकारी ॥ ७४

'बाळ नसे देव आले ।
जगतास उद्धराया ।'
गोडगोड जे बोलले ।
तेचि विसरले माया ॥ ७५
मांस जाऊन अुरला ।
जीर्ण अस्थींचा पिंजरा ।
नुरे बाळसें, पोट हो,
वारा पिअून नगारा ॥ ७६

पिला करील साउली ।
दिसे दयेचा न देव ।
डोळांदेखत होतसे ।
मातीमोल राष्ट्रठेव ॥ ७७
तुझ्या मंजु गानें होते ।
अतिताची आठवण ।
सुख वैभव वाहलें ।
जेव्हां घरादारांतून ॥ ७८

नीति न्याय धनधान्य ।
होतें समृद्ध जगत ।
स्मृति पोखरी हृदया ।
पूर आसूंचा लोटत ॥ ७९
करी बन्द गाणें, कला– ।
भुक्या पोटा होय काय ।
भुक्या पोटानें निर्मिलें ।
जगीं ज्वालेवीण काय ?" ८०

० ० ०


असा आगीचा हा लोळ ।
वरसाओस निघाला ।
होती छाती कवणाची ।
मार्गी रोधील तयाला ॥ ८१
कोणी घोषणेस करी ।
"पाप उपाशीं राहणें ।"
बोले यौवन तापून–
"पाप अुपाशी झोपणें ॥" ८२

वीर वाणी बोले त्वेषें ।
"पाप अुपाशीं जगणें ।"
सन्तवाणी बोले, "पाप–
जगीं अुपाशी मरणें ।" ८३
नभभेदी घोषणांनीं ।
तेल आगींत ओतलें ।
नर, नारी, वृद्ध, बाळ ।
सारे पेटले चेतले ॥ ८४

आग विझतां चुलींत ।
आग पेटली पोटांत ।
मनीं अुठले अुफाळ ।
ज्वाळ अुठले कृतींत ॥ ८५
आग राहे पाण्यांत हि ।
जगा आसूंनीं दाविलें ।
घरें पेटती पाण्यानें ।
आसवांनीं सिद्ध केलें ॥ ८६

कोणी म्हणे, "खाणें पाप ।
प्रजा अुपाशी ठेवून ।
प्रायश्चित्ताशीं देअून ।
नृपा करूं या पावन ॥ ८७
तया सांगूं,' देवें दिली
भूमाय अपरंपार ।
नसे कोणी तिचा धनी ।
माया तिची सर्वांवर ॥ ८८

पंचमहाभूतांवर ।
नच मालकी कुणाची ।
तरी सोडा भूमालकी ।
भूमि ही कसणारांची ।। ९
अन्नावीण कितीतरी ।
प्रभुबालकें मरतां ।
" भूमि आमुची आमुची । "
कां ढोलकीं वडवीतां । १०




"भूमि कसेल प्रेमानें ।
तोंच तिचा खरा धनी ।
विद्रोहाची प्रलयाची ।
विषमता ही जननी ।। ११
आसु यज्ञाची सांगता ।
करा धन, भूमिदान ।
श्रमदान, विद्यादान ।
सहिष्णुतेशीं जागून ।। १२

नवयुगाची चाहूल ।
जुन्या जगें ओळखावी ।
भूतकालांतील भूल ।
शहाण्यांनीं सुधारावी ।। १३
नाहीं तरी रक्तक्रांति ।
जागोनिया महाघोर ।
सुखवैभव जळून ।
गुदरेल प्राणावर । " १४

अश्रु-यज्ञ ३१५४८ वि.
अनुक्रमांक १५४०

असा आगीचा हा लोळ ।
वरसाओस पोंचला ।
राजमहालीं अेकाकी ।
घोर आकांत माजला ॥ ९५

धगधगत्या ज्वालांनीं ।
दिला वेढा महालाला ।
आणि खुपशिला हात ।
मैफिलीच्या काळजाला ॥ ९६



खवळला जनसंघ ।
पाहुनीया, मैफिलीला ।
अुतरला कैफ क्षणीं ।
नाद अैकून नाशाचा ॥ ९७


राजाराणी थरारली ।
जीवा भ्याले अधिकारी ।
काळवेळ ओळखून ।
पुढें जाहले पुढारी ॥ ९८

कर जोडून पुसती ।
"हवें काय तुम्हां बोला ।"
ज्यां न वेळ अर्ज घ्याया ।
तेच लागले पायाला ॥ ९९

फ्रान्समध्यें आसवांनीं ।
क्रान्ति केली, शान्ति दिली ।
दुःखितांसी, पीडितांसी ।
नव दृष्टि, शक्ति आली ॥ १००

# अश्रु-यज्ञ

## (हवि चवथा)



शूरवीर शिकंदरें ।
आसु मोल ओळखीलें ।
निज राज सिंहासन ।
तयावरी ओंवाळिलें ॥ १
आसवांचें केलें मोल ।
अितिहासीं अशोकानें ।
मानवता सिरवली ।
तेव्हां सुखांत डोळानें ॥ २

रेणुकेच्या आसवांनीं ।
परशुराम तापला ।
केली निःक्षत्रिय पृथ्वी ।
त्यानें अेकवीस वेळां ॥ ३
'अश्रु–यज्ञ' मोल ज्यांनीं ।
जगीं खरें ओळखीलें ।
ज्यांनीं दान आसवांचें ।
दृढ संकल्पानें दिलें ॥ ४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 31548 वि: ...
क्रमांक 9580 नों: दि: 24/11/61


'अश्रुयज्ञा' निज रक्त ।
अर्पीयेलें ओंजळीनें ।
आसुदान दिलें ज्यांनीं ।
पराक्रम, कर्तृत्वानें ॥ ५
आसुदान दिलें ज्यांनीं ।
घोर तप नि त्यागानें ।
निज सुखास होमून ।
आत्मार्पण बलिदानें ॥ ६

तयांचाच 'अश्रु–यज्ञ' ।
जगीं जाहला सफल ।
तेज चढलें पाषाणा ।
सुखी जाहले विकल ॥ ७
तायांनींच निर्मियेला ।
मानवांचा अितिहास ।
दिव्य भव्य अुभवीलें ।
चिर आसु स्मारकास ॥ ८

त्यांना वंदितसे आसु ।
कृतज्ञतेचे अर्पून ।
अश्रु–यज्ञाची सांगता ।
तीन लोकीं व्हाया पूर्ण ॥ ९
जय आसु–दान–यज्ञ ।
क्रान्ति अुत्क्रान्तीच्या ।
तुझ्या चरणीं अेवढी । रुजूं होअूं देअीं सेवा ॥ १०

## —कांहीं थोरांनीं अश्रु-यज्ञास वाहिलेला हवि—

'अश्रु-यज्ञ,' हें छोटेखानी खण्डकाव्य मराठवाड्यांतील सुप्रसिद्ध कवि श्री. शं. जा. पुरवार यांच्या आंतरिक भावनांचें दृश्य स्वरूप आहे...काव्याचा हेतु "दलितांचें अुत्थापन व्हावें, भुकेलेल्यांना अन्न मिळावें आणि दीनांना संरक्षण मिळून जगांतील कृत्रिम भेदभाव नष्ट होअून सर्वांनी सुखी व्हावें" असा आहे...मानवी जीवनांतील श्रेष्ठ मूल्यांचा आविष्कार या काव्यांत पदोपदीं झालेला दिसून येतो......

४-४-५६ रे. देशपांडे.

REFBK-0008366
REFBK-0008366

'अश्रु-यज्ञ' हें काव्य म्हणजे एका श्रेष्ठ अशा संवेदनाशील हृदयानें आपल्या भाई-बंदानां दिलेली एक अमोल देणगीच आहे! एका मराठी द्रष्ट्यानें म्हटलें आहे कीं 'ज्याला रडावेंसें वाटत नाहीं तो माणूसच नव्हे!' मी असें म्हणतों कीं, हें काव्य वाचूनहि ज्याच्या उच्च भावना उचंबळणार नाहींत त्याला खरोखर रसिकच म्हणतां येणार नाहीं!

२८-४-५७ एक रसिक, पुणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. 384
शाखा